# जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित,जळगांव.

Jalgaon Jilha Sahakari Dudh Utpadak Sangh Maryadit,Jalgaon.

## पशुखाद्य वाहतूक करीता टेंडर फॉर्म भरण्यासाठी आवश्यक नियम व अटी

1. टेंडरमध्ये वाहतूकीचे दर नमूद करतांना प्रति टन हमालीसह (वराई, भराई, उतराई, जिल्हयांतर्गत टोल टॅक्स, व महानगरपालिका टॅक्स यांचा समावेश करुन) हुक व बिना हुक असे दोन्ही दर अंकात व अक्षरी नमूद करुन वाहनाच्या क्षमतेचा स्पष्ट उल्लेख असावा. दर महा अंदाजे 2000 ते 2500 मे.टन इतके पशुखाद्य पोहोच करावे लागेल.
2. विकास पशुखाद्याची वाहतूक नशिराबाद पशुखाद्य कारखाना ते जळगांव जिल्हयातील व जळगाव जिल्हयाबाहेरील लगत असणाऱ्या संघास दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पा.संस्था, दूध संकलन गृप, डेअरी फॉर्म, ब व क दूध पुरवठा करणारे काठेवाडी यांना करावयाची आहे.
3. टेंडर फॅार्म भरतांना कोणतीही खाडाखोड नसावी. खाडाखोड झालेला टेंडर फॉर्म स्वीकारला जाणार नाही.
4. **स्वतःच्या मालकीचे वाहन असल्यासच टेंडर भरावे. (भाडयाचे वाहन चालणार नाही.)**
5. ठेका मिळाल्यानंतर वाहने एकाच कुटूंबातील वेगवेगळया व्यक्तींच्या नावे असल्यास त्यांचे नाहरकत पत्र संघास सादर करावे लागेल.
6. प्रत्येक वाहनास GPS व सीसीटीव्ही कॅमेरा असणे बंधनकारक राहील.
7. तसेच निविदा उघडण्याच्या दिवशी टेंडर धारकाने वाहनाचे आरसी बुक, वाहनाची पॉलीसी व पीयुसी यांची सत्यप्रत आणावी. सदरील प्रत पडताळणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल.
8. टेंडर धारकाने टेंडर सादर करतांना आयकर सेक्शन 194 सी अन्वये स्वतःकडे उपलब्ध असलेल्या वाहन संख्येबाबत प्रतिज्ञापत्र ₹ 20/- च्या स्टँपवर संघास सादर करावे लागेल.
9. टेंडर फॉर्मवर अनामत रक्कम भरलेल्या पावतीचा नंबर व तारीख नमूद करण्याची जबाबदारी टेंडर धारकाची राहील.
10. टेंडर दर निश्चीती बाबत टेंडर धारकाने नमूद केलेल्या तारखेस स्वतः, निर्धारित तारीख, वेळ व ठिकाणावर हजर राहणे आवश्यक राहील. टेंडर धारकास ठरवून दिलेल्या तारखेस स्वतः हजर रहाणे शक्य नसलयास आपला प्रतिनिधी म्हणून ज्यांना पाठविण्यात येईल. त्यांच्याकडे टेंडर धारकाने चर्चा व दर निश्चित करण्यासाठी लेखी स्वरुपात अधिकार पत्र देणे आवश्यक राहील. संघाचे कायम अथवा कंत्राटी कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांना कोणताही ठेका दिला जाणार नाही.
11. वाहतूकीचे टेंडर भरल्यानंतर टेंडर मध्ये कमीत कमी दर दिल्याचे निदर्शनास आल्यास व प्रत्यक्षात टेंडर स्वीकृतीच्या टेंडर धारकाने वाहतूक करण्यास असमर्थता दर्शविल्यास संबंधीत टेंडर धारकाची अनामत रक्कम जप्त केली जाईल. सदरची रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.
12. वाहतूकीचा ठेका मंजूर झाल्यानंतर पशुखाद्य वाहतूकीचे काम सुरु होण्याआधी वाहतूकीचा ठेका हस्तांतरीत करता येणार नाही. तथापी अशा प्रकारे परिस्थिती उद्भवल्यास ज्यांच्या नांवे वाहतूकीचा ठेका मंजूर झाला आहे त्या निविदा धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
13. वाहतूकीचा ठेका मंजूर झाल्यानंतर टेंडर धारकास लेखी आदेशाद्वारे कळविण्यात येईल. टेंडर धारकाने वाहतूकीसंबंधात दिलेला आदेश स्वीकारल्यानंतर अनामत रक्कम **प्रति वाहन** मोठया ट्रकसाठी ₹ 30,000/- (अक्षरी रु.तिस हजार मात्र) व मिनी ट्रकसाठी ₹ 25,000/- (अक्षरी रु.पंचविस हजार मात्र) वाहतूक आदेशात नमूद केलेल्या तारखेच्या आत संघाच्या खात्यावर रोख/ डी.डी.द्वारा भरणा करणे बंधनकारक राहील. सदरच्या अनामत रकमेवर संघाकडून कोणतेही व्याज टेंडर धारकास/ वाहतूक ठेकेदारास दिले जाणार नाही.
14. संबंधीत निविदा धारकाचे दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दिलेल्या मुदतीत अनामत रक्कम न भरल्यास, वाहन उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा वाहतूक ठेका आदेश न स्वीकारल्यास वाहतूक ठेकेदार पशुखाद्याची वाहतूक करण्यास तयार नाही असे गृहीत धरुन संबंधीत टेंडर धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**.कृ.मा.प.**

15. वाहनाच्या मालकी हक्क व क्षमता संबंधीची साक्षांकीत केलेली झेरॉक्स कागदपत्रे (म.प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय यांच्या नियमानुसार) दर पत्रकासोबत जोडाव्यात. **त्याशिवाय दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही**.

16. वाहन मालक यांचा पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांकासह.

17. पशुखाद्य वाहतूकीसाठी लावण्यात येणारे वाहन टेंडर धारकाच्या मालकीचे असणे आवश्यक राहील.

18. दूध वाहतूक वाहनावरील काम करणारे वाहक व क्लिनर यांचे वय 18 वर्षे वरील असणे आवश्यक असून ते कामकाजात प्रामाणिक, निरव्यसनी व कायम स्वरुपी न बदलणारे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेवर कुठलाही फौजदारी गुन्हा दाखल नसावा. त्यांची वर्तणूक असभ्य असल्यास किंवा ते मद्यपान केल्याचे आढळल्यास त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची व त्यांना संघाच्या आवारात प्रवेश न देण्याचा अधिकार संघास राहील.

19. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर त्वरीत खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.
    - i. ठेकेदार किंवा कंपनीच्या नावाचे पॅनकार्ड - झेरॉक्स प्रत.
    - ii. ठेकेदार यांच्या नावाचे आधारकार्ड - झेरॉक्स प्रत.
    - iii. वाहनाचे पि.यु.सी. सर्टिफिकेट - झेरॉक्स प्रत
    - iv. वाहनावरील चालक व क्लिनर यांचे वैद्यकिय तपासणी सर्टिफिकेट पासपोर्ट फोटोसह व चालक यांचे ड्रायव्हींग लायसन्सची छायाप्रत
    - v. वाहनावर हुड व ताडपत्री ठेक्याच्या मुदतीच्या कालावधीत असणे बंधनकारक राहील.
    - vi. वाहनाचे मालकी हक्काचे कागदपत्र उदा. आर.सी.बुक, मोटर पॉलीसी (थर्ड पार्टी इंश्युरंन्स, कॉम्प्रहेन्सीव्ह विमा) इत्यादी.

20. आर.टी.ओ. नियमानुसार आपल्या वाहनाच्या कमाल क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक करु नये. त्या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील.

21. पशुखाद्य वाहतूकीसाठी संघाने तयार केलेले नियम, अटी व शर्ती वाहतूकदारावर ठेक्याचा कालावधी संपेपर्यंत बंधनकारक राहतील. याबाबत वाहतूकदाराने ₹ 100/- च्या स्टँप पेपरवर संघास करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे टेंडर संबंधात संघाने तयार केलेल्या नियम व अटींचे पालन करुन टेंडर फॉर्म भरण्यात यावा. सीलबंद केलेले टेंडर फॉर्मच्या पाकीटवर ''पशुखाद्य वाहतूकीसाठीचे टेंडर'' असे नमूद करुन पाकीटावर स्वतःचे नांव व पत्ता इ. बाबतची माहिती नमूद करावी. सदरचे सीलबंद टेंडर फॉर्म संघाच्या प्रशासन विभागात कार्यकारी संचालक यांच्या नावांने निर्धारित केलेल्या तारखेच्या आंत व कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने पाठविण्याची जबाबदारी टेंडर धारकाची राहील. कोणतेही अथवा सर्व टेंडर कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क संघाने स्वतःकडे राखून ठेवलेला आहे.

**कार्यकारी संचालक**
**जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक**
**संघ। मर्यादित, जळगांव**